**प्रेसनोट दि. ०८.०९.२०२१**

लोकसेवक समाधान वसंत बिले वय ४२ वर्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक मिरज ग्रामीण पोलीस ठाणे जि. सांगली यांचे विरूध्द लाच स्विकारलेबाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

मिरज पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. बिले यांचेकडे तपास असले गुन्ह्यामध्ये तक्रारदार यांचे नातेवाईक यांना आरोपी न करण्या करीता श्री. बिले यांनी तक्रारदार यांचेकडे २५०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२७.०८.२०२१ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.२७.०८.२०२१ रोजी, दि.०१.०९.२०२१ रोजी, दि.०७.०९.२०२१ रोजी व दि.०८.०९.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचे नातेवाईकास गुन्हयामध्ये आरोपी न करण्याकरीता लोकसेवक बिले, सहाय्यक पोलीस निरीक्षक मिरज ग्रामीण पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे २५०००/- रूपये लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर हिरा हॉटेल चौक मिरज या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक समाधान वसंत बिले वय ४२ वर्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक मिरज ग्रामीण पोलीस ठाणे जि. सांगली यांनी तक्रारदार यांचकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून २५,०००/- रूपये स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले आहे.

लोकसेवक समाधान वसंत बिले वय ४२ वर्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक मिरज ग्रामीण पोलीस ठाणे जि. सांगली रा. पंढरपूर रोड, अधिकारी निवास्थान मिरज ग्रामीण पोलीस ठाणे ता. मिरज जि.सांगली मुळ रा.खोमनाळ ता. मंगळवेढा जि. सोलापूर यांचे विरुध्द मिरज शहर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री सुहास नाडगौडा, श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक,प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, सलीम मकानदार, अजित पाटील, संजय संकपाळ, भास्कर भोरे, प्रितम चौगुले, धनंजय खाडे, राधिका माने, श्रीपती देशपांडे, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner